## प्रकरण 3 रे

## 'रानकवी' यशवंत तांदळे

एखाद्या ललित कृतीचा अभ्यास करताना त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या जडणघडणीचा आलेख मांडण्याची आवश्यकता कधी कधी भासू लागते. कारण साहित्यनिर्मिती ही साहित्यिकाच्या जीवनविषयक दृष्टीकोनावर अवलंबून असते. माणसाच्या जीवनविषयक दृष्टीकोन त्याच्या मनोभूमीकेवर अवलंबून आहे. म्हणून साहित्यिकाच्या जीवनचरित्राला त्याच्या साहित्याच्या अभ्यासाच्या दृष्टीने महत्व प्राप्त होते.

साहित्यिकाच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण त्याचा वंश व कूल याबरोबरच त्याच्यावर लहानपणी झालेले संस्कार, त्याच्या सभोवतालची सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि आर्थिक परिस्थितीवर अवलंबून असते. असे व्यक्तिमत्व आपल्या जीवनविषयक दृष्टिकोनानुसार स्वानुभवाने कलात्मक रूप देत रहाते. कलावंत हा ही एक माणूसच असतो. माणूस म्हणून त्याला आलेले अनुभव सांगण्याचा तो प्रयत्न करतो. म्हणून चरित्र समजून घेतल्याशिवाय त्याच्या कलाकृतीला योग्य न्याय देता येणार नाही. अशी काही समीक्षकाची भूमिका आढळते.

यावरूनच चरित्रात्मक साहित्यसमीक्षा विकसित झाली असली तरी तिचा साहित्यसमीक्षेत किती वापर करावा व कसा करावा याविषयी मतभिन्नता आढळते. मात्र यशवंत तांदळे यांच्या काव्य निर्मितीचा विचार करतांना त्यांची आवश्यकता भासते. कारण त्यांची कविता हे त्यांनी जगलेल्या जीवनानुभवाचे हुंकार आहेत.

**यशवंत तांदळे यांचे जीवनचित्र व वंशपरंपरा.**

यशवंत तांदळे यांचे पूर्ण नाव यशवंत लखोजी तांदळे, रा.आसद, ता.खानापूर, जि.सांगली असे आहे. मात्र आसद हे काही त्यांचे मुळ गाव नव्हे. हे घराणे मूळचे आरेवाडी ता.कवठेमहंकाळ, जि.सांगली येथील होय. शालीवाहन शके 1155 इ.स. 1233 मध्ये त्यांच्या मूळ पुरुषाने तांदळे हे आडनाव धारण केल्याची नोंद मिळते.[1] आरेवाडीचा मूळ पुरूष संताजी तांदळे. त्यांची तेथे मोठी शेती होती. हा भाग दुष्काळी असल्याने अनेक कुटुंबे गावे सोडून अन्यत्र स्थायिक होत राहिली आहेत. संताजीच्या कुटुंबावरही अशी वेळ आल्याची दिसते. संताजीच्या वंशातील सुर्याप्पा हे असेच केव्हातरी भटकंती करत करत आपले गाव सोडून बिचूद, ता.वाळवा, जि.सांगली येथे स्थायिक झालेले आढळतात. तर बिरू यानेही आरेवाडी सोडून शिरटे , ता.वाळवा,

जि.सांगली येथे वास्तव्य केल्याची नोंद मिळते. याच घराण्याचा तिसरा पुरुष मायाप्पा पेशवाईत आसद, ता.खानापूर, जि.सांगली येथे येऊन स्थिरावलेला आढळतो. यांचे बिरोबा हे कुलदैवत तर चिंचणीची (मायाक्का) म्हाकूबाई ही कुलदेवी होय. आजही लग्नकार्यात या दैवतांच्या नावाने पाच पालवीचे देवक बसविले जाते.

वरीलपैकी मायाप्पाच्या वंश विस्तारात यशवंत तांदळे यांचे स्थान आहे. मायाप्पाने>राणोजी> बाबाजी असा वंश वाढला. बाबाजीला दोन मुले होती. एक तुकाराम व दुसरा सयाजी होय. या सयाजीला मानाजी ऊर्फ लखोजी असा मुलगा झाला. या मानाजीच्या पोटी यशवंत तांदळे यांनी जन्म घेतला. यशवंत तांदळे याची अशारितीने वंशपरंपरा मिळते.

**आईवडील व शिक्षण**

यशवंत तांदळे यांची पूर्वपरंपरा पाहिल्यानंतर त्यांच्या जीवनाचा व शैक्षणिक बाबींचा विचार करणे क्रमप्राप्त होय. यशवंत तांदळे यांची आई श्री.धोंडी मेटकरी, विटा, ता.खानापूर, जि.सांगली यांच्या कुटूंबातील होती. तिचे नाव हौसाबाई असे होते. यशवंत तांदळे हे जातीने धनगर होते. त्यांच्या पूर्वजापासून चालत आलेला व्यवसाय म्हणजे शेळयामेंढया पाळणे हा होय. यशवंत तांदळे यांचे लहानपण हे मामाच्या गावी म्हणजे विटा येथे गेले आहे. विटयामध्ये त्याला वसंता असेही म्हणत. मामाच्या घरी यशवंताचे दिवस सुखासमाधानाचे गेले. त्यामुळे त्यांचा स्वभाव खोडकर होण्यास सुरुवात झाली. परंतु योगायोगाने त्याचा कल निसर्गाकडे जाऊ लागला. व निसर्गामध्येच ते रमू लागले. अशा कालावधीत यशवंताच्या वडिलांना कुत्रे चावून त्यातच त्यांचा अंत झाला. त्यांच्या घरची आर्थिक परिस्थिती बेताचीच होती. परंतु वडील मयत झाल्यानंतर जास्तच खालावत गेली. याचा बाळ यशवंताच्या मनावर परिणाम होऊन तो अंतर्मुख झाला असे त्यांच्या आजोळी मिळालेल्या माहितीवरुन म्हणता येते.[2] आपण मामांच्या घरी रहात आहोत याची त्याला खंत वाटू लागली. व जास्तच त्यांचा ओढा हा निसर्गाकडे ओढू लागला आणि त्यातच तो रममाण होऊ लागला. मामाला वाटले की यशवंताला आपण शाळेत घालावे. परंतु शाळा म्हटले की त्याला नको वाटायचे. मामाच्या या आशेची निराशा झाली. आपल्या भाच्याला लिहिता वाचता यावे अशी अपेक्षा होती. परंतु यशवंताला शाळेचे नाव घेताच नको वाटायचे. मामांनी शाळेत जाण्याविषयी खूप समजावून सांगितले पण त्यांचा त्याच्यावर काहीही परिणाम झाला

नाही. अखेर मेंढरे राखण्याकडेच त्यांचा कल वळला. कारण मेंढराच्या पाठीमागे फिरताना आपणाला निसर्गातील वेगवेगळया गोष्टी पहावयास मिळतील. कोणाच्याही आहारी जायचे नाही. आपण मुक्त व निसर्गाच्या सान्निध्यातच जीवन जगावयाचे असे त्याला वाटत होते. शाळेत जाण्याबाबत आईनेही त्याची खूप समजूत काढली पण त्यांचाही काही उपयोग झाला नाही. तो शेळयामेंढया राखणे यातच आनंद मानू लागला. त्याचे शेळयामेंढया हेच जणू मित्र बनले. मेंढराच्या सहवासात तो फडावर झोपत असे. रोजच आपले शेळयामेंढया राखण हे काम आहे असे त्याला वाटू लागले. निसर्ग हेच आपले घर वाटू लागले. आपल्या स्वतःच्या द्रारिद्रयाची त्याला खंत वाटू लागली. परंतु आपल्यासारखे जीवन सभोवताली अनेक माणसे जगत आहेत हे ही त्यांनी अनुभवले.

प्राप्त परिस्थितीत जीवन जगणे एवढेच आपण करू शकतो. अशी त्यांची धारणा झाली. मामा, मामी, आई आणि कुटुंबिय मंडळींचा आधार घेऊन ते जीवनाची वाटचाल चालू लागले होते.

**संस्कार व जीवनव्यवसाय**

रानकवी यशवंत तांदळे यांची परिस्थिती गरीबीचीच होती. शेळयामेंढया राखणे व त्यावरच आपला उदरनिर्वाह चालविणे हा त्यांचा दिनक्रम होता. या निमित्ताने रोजच वेगवेगळया शेतात जावे लागत असे. त्यामुळे त्या शेताचा एखादा मालक चांगला असला तर तो त्यास काहीही बोलत नसे. परंतु एखाद्याच्या शेतातील पिकात एखादी शेळीमेंढी गेली तर त्या शेताचा मालक काहीही बोलत असे परंतु त्याला यशवंत तांदळे यांनी कधीही प्रत्युत्तर केले नाही. असा एखादा प्रसंग आला तर त्यांना म्हणत 'नाही दादा, पुन्हा नाही इकडे येत' असे म्हणत असे त्यांना अनुभव येत. त्यामध्ये त्यांना आपल्या व समाजाच्या द्रारिद्रयाची प्रकर्षाने जाणीव झाली. असा विचार करण्याची सवय त्यांना लहानपणापासूनच होती. त्यातून काही लोकांना नानाविध प्रकारचे प्रश्न विचारणे व त्यांच्या प्रश्नात सत्यता शोधणे ही जिज्ञासू वृत्ती त्यांच्यात बळावू लागली. तशातच धनगर जातीतील लोकांना ओव्या म्हणण्याचा छंद आहे. त्यांच्या ओव्यांमध्ये धर्म, पुराणातील व देवादिकाच्या कथा असतात. त्यावर ते विविध प्रश्न विचारीत. त्यांची उत्तरे स्वतःच वेगवेगळया प्रकारे शोधत असत. काही प्रश्न आपल्या साथीदारांनाही विचारत,'त्याचे उत्तर 'असेच का? 'तसेच का ?' असे त्यांना विचारत. मग काही प्रश्न ते साथीदारांना विचारू लागले. त्या साथीदारांना सहसा उत्तरे देता येत नसत. पण त्यांची उत्तरे मार्मिक भाषेत ते

देत असत. प्रश्न विचारणे, त्याची उत्तरे देणे असे करत करत शेळयामेंढया राखता राखताच त्यांना गुणगुणावयाची सवय लागली. त्यांना ओव्या म्हणायचा छंदही जडला. इथेच त्यांना या लोकगीताचा सूर सापडला. दुसऱ्याच्या ओव्याला झील देता देता ते निसर्गाशी एकरूप होऊ लागले. व स्वतःच ते काहीबाही बडबडू लागले. आणि ते बडबडणेच भविष्यातील त्यांची कविता झाली. पडणाऱ्या पावसाच्या सरी खुणावू लागल्या. हे भिजलेपणच त्यांना काव्यरसात भिजवू लागले. शेतावर फिरणारी मेंढरे त्यांना मुंग्याप्रमाणे दिसू लागली. निसर्गातील दिसणारी दृश्ये त्यांना वेगवेगळी वाटू लागली. उंच अशा डोंगरावर उभे राहिल्यावर डोंगराच्या दऱ्याखोऱ्यात सभोवतालची शेते त्यांना खुणावू लागली. तिन्हीसांजेच्यावेळी डोक्यावरुन जाणाऱ्या वेगवेगळया पक्षांच्या रांगा, डोक्यावर ओझी घेऊन कमरेवरती लहान बालके घेऊन घराकडे परतणाऱ्या स्त्रियांच्या रांगा दिसू लागल्या. ती दृश्ये पाहून त्यांना एक वेगळाच सुखद अनुभव येऊ लागला. तसेच आपल्या शेळयामेंढयाच्या रांगाही त्यांना वेगळयाच वाटू लागल्या आणि यावरच ते स्वतःच गुणगुणू लागले,

'मेंढरु माझ मैतर गा मैतर

माणसापरास लई बर व्ह, लई बर'

अशारीतीने त्यांच्या अविष्काराचा शब्द बद्ध होऊ लागला. ओव्या ऐकायला जाणे हा त्यांचा नित्याचाच क्रम होऊन बसला. त्यांना काही लिहावेसे वाटेनासे झाले. कारण त्यांच्या आड येत होत ते शिक्षण. शिक्षण नसल्यामुळे त्यांना अक्षरज्ञान नव्हते. परत त्यांना वयाच्या नवव्या दहाव्यावर्षी आपण शाळेत जावे असे वाटू लागले. ते शाळेच्या भोवती फेऱ्या घालू लागले. परंतु आपल्यापेक्षा वयाने लहान, शरीराने लहान असणारी मुले त्यांनी पाहिली. त्यांना आपणच त्या पहिलीच्या वर्गात मोठे दिसणार, म्हणून लाज वाटू लागली. परंतु आपल्या यशवंताची इच्छा शाळेत जावयाची आहे असे पहाताच त्यांच्या मामांनी त्याला शाळेत बसविले. परंतु मुले चिडवतात म्हणून शाळेत जाण्याचा नाद सोडून दिला. परत यशवंता मेंढरांच्या पाठीमागे जाऊ लागला. तोच त्यांचा प्रपंच होऊन बसला. दररोज सकाळच्या वेळी घरचे काम संपवून नंतर मेंढरे घेऊन बाहेर पडत असे. दिवसभर रानावनात मेंढरे घेऊन फिरत असे. रानावनातील वारा पिऊन यशवंताचा पिंड भलताच दिसू लागला. यातच त्याला देवपूजेचेही ध्यान लागले. रात्रीच्यावेळी ऐकलेल्या ओव्या, त्या ओव्यामधील ताल, त्याच्या कानात घुमू

लागला. त्याच तालावर ते कवने रचू लागले. तशातच आपला मेंढरामागचा मित्र भिमा त्याची व यशवंताची चांगली दोस्ती जमली. तोही जातीने धनगरच होता. मात्र वयाने तो यशवंतापेक्षा मोठा होता. यशवंता भिमाला नानाप्रकारचे प्रश्न विचारी. कधी कधी तो विनोद करे. भिमाही कधी कधी गाणी म्हणायचा हे यशवंताला माहिती होते. त्यामुळे यशवंता भिमाला मुद्दाम गाणे म्हणायला लावीत असे. त्यांच्यासारखे त्यांच्या सुरासारखे यशवंताला गाणे म्हणता येईना, पण गाणे म्हटलेच पाहिजे अशी भिमाने गळ घातली. 'मी उद्या गाणे म्हणतो' असे यशवंताने भिमाला सांगितले. आता गाणे म्हणण्याचा प्रश्न यशवंतापुढे उभा राहिला. या विचारातच यशवंत रात्रभर विचार करु लागला. सकाळ होताच यशवंता पुन्हा मेंढराच्या पाठीमागे गेला.व भिमाची भेट झाली आणि भिमाने गाणे म्हण म्हणताच यशवंतानी भिमाला गाण्यातच कोडे घातले.

" कुणाला सहा पाय ?

कुणाला तीन पाय, ?

आणि कुणाला एक पाय ग जाणा ?

असा यशवंताने जणू भिमाला उखाणा घालून कोडयातच पाडले. भिमाला काही सुचेनासे झाले. तो यशवंताच्या पुढे निशब्दच झाला. भिमाने येणाजाणाऱ्या काही माणसांना या उखाण्याचे उत्तर विचारले. परंतु त्यांनाही त्याचे काही उत्तर देता येईना. मग यशवंताकडे भिमा व ते लोकही कौतुकाने पाहू लागले. कोणालाच याचे उत्तर देता येईना हे पाहून यशवंताला आनंद झाला. मग यशवंतानेच त्याचे उत्तर दिले.

" मुंगळयाला सहा पाय,

वावडीला तीन पाय,

अग भिंगरीला एक पाय ग जाणा! "

या यशवंताच्या उत्तराने भिमा व ज्यांना प्रश्न विचारले होते ते आश्चर्यचकित झाले आणि यशवंताच्याविषयी सर्वांच्या मनामध्ये सहानुभूती निर्माण झाली. आता यशवंताचा स्वतःबद्दलचा आत्मविश्वास वाढू लागला. दुसऱ्या दिवशी यशवंता दिवसभर विचार करु लागला आणि भिमाला त्यांनी दुसरे कोडे घातले

" कुणाला सहा डोळे ?

कुणाला तीन डोळं ?

कुणाला एक डोळा ग जाणा ?

त्याच्या या प्रश्नाने भिमा पुन्हा निरुत्तर झाला. आपणाला याचे काही उत्तर देता येत नाही. म्हणून भिमा नाराज झाला. भिमा मेंढया चारता चारता आपल्या जातीतील आणि शेजारपाजाऱ्याला, वृद्धांना, म्हाताऱ्या स्त्रियांनाही तो याचे उत्तर विचारु लागला. पण त्याचे उत्तर कोणालाच देता येईना. लोक भिमाला विचारत की 'असले प्रश्न तरी कुणी विचारले' त्यावेळी भिमा म्हणे 'ज्ञानू मेटकरी नाही का त्यांचा भाचा यशवंता याने हे प्रश्न विचारले'. आयाबायांना त्याच्या बुद्धिमत्तेचे कौतुक वाटू लागले. 'हौसाबाईचं पोरग हुशार जलमलं' असे उद्गार त्यांच्या तोंडातून येऊ लागले. यशवंताला याविषयी आणखी अभिमान वाटू लागला. आणि मग यशवंताने याचे उत्तर दिले,

"पण्याला सहा डोळं।
नारळाला तीन डोळं।
सुईला एक डोळा ग जाणा।"[5]

या त्याच्या उत्तराने म्हाताऱ्या आयाबायांनी त्याच्या गालावरुन कौतुकाने हात फिरविले आणि स्वतःच्या कानशिलावर आपली बोटे मोडली आणि त्याची दृष्ट काढली. अशारितीने यशवंता दररोज प्रश्न विचारी यातूनच त्यांना कविता करण्याचा जणू छंदच लागला, व तो कविता रचू लागला. हे पाहून मामाला वाटले आपल्या भाच्याला त्याच्या गावी म्हणजे आसदला घालवावे. कारण यशवंताची आठवण त्याच्या आईला होऊ लागली होती. आपला पोरगा गाणी, कविता म्हणू लागला याचाही अभिमान वाटू लागला. एके दिवशी यशवंताचे मामा ज्ञानू मेटकरी यांनी यशवंताला आसदला आणून घालविले. त्यावेळी यशवंताचे वय 12-13 वर्षाचे होते.

**यशवंत तांदळे यांचे कौटुंबिक जीवन**

यशवंताच्या घरी प्रथमपासूनच शेळयामेंढया चारण्याचा व्यवसाय होता. तो आपल्या वडिलांच्याबरोबर दररोज मेंढया राखावयास जाऊ लागला व तो आपल्या वडिलांच्या सावलीत राहू लागला. यशवंताच्या वडिलांचे लखोजी व आईचे नाव हौसाबाई असे होते. असेच काही दिवस गेल्यावर यशवंताचे वय वाढले. तसतसे त्याच्या आईवडिलांच्या मनात आले की 'आपण यशवंताचे दोनाचे चार हात करावे' असा विचार करीत असताना यशवंताचे मामा आसदला आले. पण यशवंता आपला कविता करण्याच्या नादातच असायचा. पण एका बाजूला तो तरुण असल्यामुळे त्यांच्याही डोळयात संसाराची सुखस्वप्ने दिसू लागली. पण हे क्षणभरच.

मामा दोन दिवस आसदला राहून विटयाला आपल्या घरी निघून गेले. तशातच यशवंतावर मोठी आपत्ती कोसळली. त्याचे वडील लखोजी यांना कधी तरी कुत्रे चावले होते. त्याच्याकडे त्यांचे दुर्लक्ष झाले होते. त्याच्यावर त्यांनी कोणतेच औषध घेतले नव्हते. त्यातच त्यांचा अंत झाला. आता सर्व घराचा भार यशवंतावरच पडला. त्याचे मन घरात लागेनासे झाले. मामाला वारंवार यशवंता आसदला बोलावी. त्याप्रमाणे मामा वरचेवर आसदला यायचे. मामालाही सारखे आसदला यावयास नको वाटायचे म्हणून यशवंताच्या मामांनी यशवंताला व त्याच्या आईला विटयाला काही दिवसासाठी नेले. परंतु विटयामध्ये आपण किती दिवस रहावयाचे असा प्रश्न यशवंताच्या आईला पडायचा. तसेच 'आपले माहेरामध्ये राहून भागेल का?' 'आपल्या यशवंताचे कसे होणार?' 'आपल्या आसदच्या घराचे व जमीनीचे काय होणार?' असे अनेक प्रश्न यशवंताच्या आईला भेडसावू लागले. एके दिवशी आपल्या भावाला तिने आपल्याला जे काही वाटत होते ते सर्व सांगितले. ते सर्व यशवंताच्या मामाला पटले. त्यांनी यशवंताला व त्याच्या आईला आसदला जाण्यास परवानगी दिली. त्याप्रमाणे ते आसदला आले. यशवंताचे वडील मयत झाल्यापासून त्याच्या चुलत्याने संपूर्ण जमीन घेतली होती.

यशवंताच्या आईने आपल्या दिराकडे आपल्या जमीनीची वाटणी मागितली. परंतु तिची मागणी त्याने झिडकारून टाकली. व दमदाटी द्यावयास सुरूवात केली. परंतु ही दमदाटी यशवंताच्या मनाला सोसेनाशी झाली. यशवंता आपल्या चुलत्याला जुमाननेसा झाला. चुलत्यात व यशवंतामध्ये जमीनीच्या पायी वादविवाद होण्यास सुरुवात झाली. परंतु हे वादविवाद कोठपर्यंत चालत रहावयाचे व या वादाला कंटाळून यशवंताच्या चुलत्याने एके दिवशी गावातील लोकांच्या सांगण्यावरून पंधरावीस मेंढरे आणि थोडीशी जमीन यशवंताला देऊन टाकली. मग यशवंता आपल्या शेतीमध्ये राबू लागला व मेंढयाही राखू लागला. आई उतारवयाला लागली होती. आईने यशवंताकडे त्याच्या लग्नाचा प्रश्न काढला. परंतु यशवंताचे मन आईच्या बोलण्याकडे नसे. तो दिवसेंदिवस उदास होऊ लागला. यशवंताची अशी मानसिक अवस्था पाहून आईने आपल्या भावाला बोलावून घेतले. आणि लग्नाविषयी तिने भावाशी बोलणी केली. मग मामाने यशवंताची समजूत काढली व यशवंताला लग्नाला तयार केले. मामाने दुधोंडी, ता.तासगाव, जि.सांगली या गावची मुलगी वैजयंती हिच्याशी त्याचा विवाह लावून दिला.

वयाच्या 22 व्या वर्षी यशवंताचा विवाह झाला. परंतु यशवंताचे लक्ष काही संसारात लागेना.

त्याचे सारे लक्ष शेळयामेंढयावर असे. मनाने तो निसर्गाशी एकरुप होत असे. निसर्गातील काही दृश्ये पाहून त्याला कविता स्फुरू लागली. तो त्या मेंढराच्या पाठीमागे गुणगूणु लागला. त्या कवितांना वेगवेगळया चाली लावू लागला. शेळया मेंढया सायंकाळी एखाद्या शेतकऱ्याच्या शेतावर बसावयास असायच्या. त्याठिकाणीच तो रात्रीचा आपल्या मेंढयाच्या राखीणीसाठी झोपायचा. चारचार, आठआठ दिवस तो घरी यायचा नाही. म्हणून त्याच्याबरोबरचे मेंढपाळ त्याला चिडवू लागले. चेष्ठा करु लागले. आपोआपच तो संसाराकडे ओढला गेला व संसारात रममाण होऊ लागला.

यशवंताची पत्नी दिसायला बरी. धणधाकट व अत्यंत मायाळू स्वभावाची होती. तिच्या या अशा स्वभावामुळे घरामध्ये एक प्रकारचे चैतन्य निर्माण होऊ लागले. त्यांना दोन मुली व एक मुलगा झाला. मुलाचे नाव पोपट असे आहे. दोन मुलींची लग्ने झाली. घरी पोपट फक्त एकटाच राहिला. त्याच्या बोलण्याने मन हलके हलके होऊ लागले. त्यांच्यातले पितृत्व जागे झाले. यशवंता आपल्या या मुलाला बरोबर घेत असे. त्याचे बोबडे बोल व खेळ यशवंताच्या कविताच्या कवितेची स्फुर्तीस्थाने बनली. एकाएकी यशवंताच्या मनात संसाराविषयी विरक्ती निर्माण झाली. त्याचे चित्तच कशात लागेनासे झाले आणि परत तो आपल्या शेळयामेंढयात रमु लागला. त्यांच्या पाठीमागे भटकू लागला. असे करीत असताना यशवताच्या घरी आणखी एक दु:खद घटना घडली. यशवंताची आई अल्पशा आजाराने मृत्यू पावली. आता मात्र यशवंताला एकाकीपणा जाणवू लागला. त्याला हे दु:ख सोसवेनासे झाले. आईच्या दु:खाने तो अगदीच व्याकुळ झाला. आणि त्यावेळी त्याने 'आईची माया' ही कविता रचली. ती खूप गाजली. या कवितेमध्ये त्याने आईची महती गायली आहे. आणि आपल्या काव्यप्रवृत्तीचे श्रेय ते आपल्या आईलाच देतात व पुढे म्हणतात,

" आई हाय हो धानाचा मळा,
तिन फुलविला माझा गळा,
तिच्या पायावर वाकवूया मान,
आई मला दे ग तुझ वरदान। "[6]

अशाप्रकारे यशवंत तांदळे यांची कविता आईच्या विरहानंतर साकार होऊ लागली. व आता

यशवंताचे लक्ष कशातच लागेनासे झाले.

याच कालावधीत सांगली जिल्ह्यात साहित्याच्या चळवळी आकाराला येऊ लागल्या होत्या. विटा, सांगली, इस्लामपूर, कामेरी, आष्टा, येडेनिपाणी तसेच वेगवेगळया गावात लहान मोठी साहित्य संमेलने भरु लागली. साहित्य संमेलनामध्ये कवी संमेलन हा एक महत्वाचा कार्यक्रम असतो त्या कार्यक्रमाला यशवंता जात असे. अनेक कविंच्या कविता ऐकत असे व आपल्यालाही अशा प्रकारच्या स्टेजवर जावयास मिळेल का असे त्याला वाटू लागे. व काही छोटया छोटया कार्यक्रमामध्ये संमेलनामध्ये ते सहभागी होऊ लागले. अशारीतीने यशवंत तांदळे हे कवि म्हणून सुपरिचित झाले.

पुढे सद्गुरु गाडगे महाराज कॉलेजमधील मराठी विषयाचे प्रा. डॉ.कन्हैया कुंदप यांची आणि यशवंत तांदळे यांची ओळख झाली व कॉलेजमध्ये वेगवेगळया कार्यक्रमातून यशवंत तांदळे आपले काव्यगायन करु लागले. कॉलेजमधील तरुण मुलामुलींना आवडतील अशा उस्फुर्त रचना ते सादर करु लागले. त्यामुळे ते साहित्यिक क्षेत्रात अधिक लोकप्रिय झाले. हा कालखंड साधारणपणे 1972-73 चा होता. त्यांच्या कविता ऐकल्यावर त्यातील लोकधुंद आणि लोकमानसातील शब्दसामर्थ्यामुळे श्रोत्यांच्या मनात कायमच्या ठसत. स्वतः यशवंत तांदळे हे कविता लिहित नसत लोकांच्या मात्र त्या मुखद्गत होत असत.

यशवंत तांदळे यांना निसर्गाची ओढ होती. त्यातच 1972 साली दुष्काळ पडला. त्या दुष्काळाने अधिक भयंकर उग्र रूप धारण केले होते. खावयास अन्न नाही, जनावरांची उपासमार होत होती. लोकांच्यावर अन्नान्न करण्याची पाळी आली होती. या भयानक अवस्थेने यशवंताचे मन पिळवटून निघाले. यशवंता आपला व्यवसाय करत करत वेगवेगळया गावांना भेटी देऊ लागले. तेथील लोकांची अवस्था पाहू लागले याच मनःस्थितीत यशवंताने 72-73 च्या दुष्काळाचे वर्णन करणारी 'दुष्काळ' नावाची कविता लिहिली. याच्या उलट अवस्था 1974 साली झाली 1974 साली भरपूर पाऊस पडला . ज्वारी, हायब्रीड ही पिके चांगली जोमात आली. परंतु त्या जोंधळयावर इसाळा नावाचा रोग पडला. त्यामुळे लोकांचे मोठया प्रमाणावर धान्याचे नुकसान व लोकांची पाऊस पडूनही दयनीय अवस्था झाली. त्या रोगावर 'ईसाळा' नावाची कविता लिहिली.

यशवंत तांदळे ज्या ज्या ठिकाणी संमेलने, मेळावे, शिबिर असे कार्यक्रम असत तिथे जाऊन

आपल्या अस्खलित ग्रामीण ढंगात विनोद निर्मिती करत. ती कविता उत्स्फुर्तपणे लोकांच्या पुढे सादर करीत असत. या धनगराच्या शीघ्र कवित्वाला आता तोड राहिली नव्हती आणि म्हणूनच सुशिक्षित, अशिक्षित जनमानसातून कवी यशवंत तांदळे यांना भरभरुन प्रतिसाद मिळू लागला. टाळयांचा प्रचंड कडकडाटात या कवीचे स्वागत होऊ लागले. आणि हा कवी स्वप्नी, जागृती, सुशुप्ती या तीन्ही ही अवस्थातून केवळ कविता जगू लागला.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन कराड येथे 1975 साली भरले होते. त्याचठिकाणी यशवंत तांदळे यांच्या कवितेचे खरेखुरे श्रेष्ठत्व प्रत्ययाला आले. त्यावेळी मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष दुर्गा भागवत होत्या. कविसंमेलनाचे अध्यक्ष कवी अनिल हे होते. शेकडो कवीच्या कविता वाचनाचा कार्यक्रम झाला. व्याख्याने झाली, चर्चा झाल्या. यशवंत तांदळे हेही कविता म्हणावयास आले होते. यांच्या खांद्यावर घोंगडे, डोकीला फेटा असा अवतार पाहून त्यांना कोणी फिरकूही दिले नाही हे चटकन प्रा. डॉ. कन्हैया कुंदप यांच्या लक्षात आले व कन्हैया कुंदप यांच्या विनंतीवरुन यशवंत तांदळे यांना व्यासपीठावर आपली कविता सादर करण्याची संधी मिळाली. या प्रसंगाची तुलना शिकागो येथील धर्म परिषदेशी करता येईल. कारण हिंदू धर्माचे प्रतिनिधित्व करणारे विवेकानंद यांची जशी थट्टा झालेली होती आणि व्यासपीठावर त्यांनी आपले श्रेष्ठत्व सिद्ध केलेले होते. त्यासारखेच पायातील धनगरी चप्पल, खांद्यावर घोंगडे, डोक्याला मुंडासे, धोतर आणि शर्ट हे सारेच मळकटलेले अशा स्थितीत हा कवी लोकांच्यासमोर उभा रहाताच लोकांनी नाकेडोळे मोडले. आणि लोक त्यांना हसू लागले. पण त्यांचा विचार न करता आपल्या कानावर हात ठेवला आणि 'मिजमाशी' ही कविता खडया आवाजात गायला सुरुवात केली. लोकांच्या तनमनाचे पारणे फिटले. लोकांच्यातून 'वन्स मोअर! वन्स मोअर!' असे आवाज ऐकू येऊ लागले. टाळयांचा प्रचंड कडकडाट झाला. बिचाऱ्या यशवंताना हे समजेनासे झाले. त्यांना वाटले की लोक आपणाला 'खाली बसा' म्हणत आहेत. व ते व्यासपीठ सोडून निघाले. त्याचवेळी पु. ल. देशपांडे यांनी यशवंत तांदळे यांना हाक मारली आणि खुर्ची बसायला दिली व त्यांनीच त्यांना "रानकवी" ही पदवी देऊन टाकली. त्यावेळेपासून त्यांना "रानकवी यशवंत तांदळे" या नावानेच लोक ओळखु लागले.

रानकवी यशवंत तांदळे लोकमानसात प्रसिद्ध पावले आणि सरकारी योजनांवरही काव्य करू लागले. 1975 ला इंदिरा गांधीनी आणीबाणी जाहीर केली. त्यावरती त्यांनी रचना केली. 20 कलमी

कार्यक्रमावर त्यांनी आपली रचना केली. पुढे कृष्णाकोयना नदीला 1977 मध्ये जो महापूर आला होता त्यावरही त्यांनी कविता रचली. स्त्रीमुक्ती, दारूबंदी, कुटुंबनियोजन अशा अनेक विषयावर त्यांनी उत्स्फुर्त रचना लोकांच्यासमोर सादर केल्या. बेळगाव, नाशिक, पुणे, मुंबई, सोलापूर, कोल्हापूर येथील साहित्य संमेलनातून त्यांना प्रचंड प्रमाणावर प्रसिद्धी मिळाली. आणि मेंढपाळाच्या व्यवसायाबरोबरच काव्य करणे हेच त्यांचे जीवित ध्येय बनले.

पुढे अनेक वर्तमानपत्रातून त्यांना मोठया प्रमाणावर प्रसिद्धी मिळू लागली. आणि तत्कालीन वाड्.मयात त्यांचे साहित्य हे नावारूपाला येऊ लागले. त्यामुळे पुण्यामुंबईच्या विचारवंताच्या कवितेला अथवा पांढरपेशा साहित्यिकाच्या साहित्य रचनांचा जनसामान्यातून दाद मिळेनाशी झाली. या साहित्यिकाकडून यशवंत तांदळे यांच्यावर कुचेष्ठा होऊ लागली. साहित्यिक यशवंत तांदळे यांना व्यासपीठ देईनासे झाले. कारण तांदळे यांच्या कवितेखेरीज अन्य कोणाच्या कवितांना लोकांकडून दाद मिळत नसे. त्याचवेळी केशवराव भोसले नाटयगृहात दक्षिण महाराष्ट्र साहित्य संमेलने भरले होते. संमेलनाचे अध्यक्ष ग.ल.ठोकळ आणि कवि संमेलनाच्या अध्यक्षा सरोजिनी बाबर व उद्घाटक यशवंतरावजी चव्हाण यांच्यासमोर त्यांनी आपली कविता सादर केली. संपूर्ण संमेलनाचे श्रेष्ठत्व त्यांनाच मिळाले आणि म्हणूनच साहित्यिकाच्या मनात रानकवी यशवंत तांदळे हे सलू लागले. याची परिणीती त्यांच्या असह्य आजारपणात आली.

**तत्कालीन वाड्.मयीन प्रवृत्ती**

तत्कालीन वाड्.मयीन प्रवृत्ती ही वैचारिक बैठक घेऊन आकाराला येत होती. हा कालखंड बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारसरणीने भारलेला होता. दलित साहित्य भरभरुन लिहिले जात होते. वेदना, विद्रोह, नकार, समता, स्वातंत्र्य व बंधुता यांनी हे दलित साहित्य स्थिरावले होते. तर काही वाड्.मयातून बदलत्या काळाचे चित्रण होऊ लागले होते. अशा प्रकारे चिंतनशील वैचारिक बैठक घेऊन साहित्य आकार घेऊ लागले होते. सुशिक्षितांची नवी पिढी मात्र प्रेमकाव्याच्या स्वप्नील विश्वात तल्लीन होती. अशाच कालावधीत यशवंत तांदळे यांची सत्य स्वरुपातील प्रत्यक्ष वस्तुनिष्ठ कविता आकाराला येत होती. गरीब-श्रीमंत असा भेद न रहता सर्वच लोक दुष्काळाने ग्रासल्यामुळे मिळेल ते काम करण्यास जात असत. या बदलत्या स्थितीचे चित्रण

यशवंत तांदळे यांच्या कवितेतून होऊ लागले. आणि त्यामुळेच त्यांची कविता ही उत्स्फुर्त होती. तरीदेखील ती वास्तव होती. ही वास्तव चित्रणे या कवितेतून होऊ लागली. तत्कालीन वाड्.मयीन प्रवृत्ती ही जीवनाच्या भयाण स्वरूपाने ग्रासलेल्या समाजाचे चित्रण करत होती. तर दुसऱ्या बाजूला दलित साहित्य हे मोठया प्रमाणावर लिहिले जात होते. दलित साहित्याबरोबरच ग्रामीण वास्तव जीवनाचे भान राखून ग्रामीण साहित्यिकाची नवी पिढी उदयाला आली होती. ती ज्या मातीत वाढली, ज्या पाण्यावर पोसली, व ज्या संस्कृतीत मोठी झाली तिचे दर्शनही ग्रामीण साहित्य घडवीत होते. ग्रामीण साहित्याची प्रवृत्ती मूलतः गदयात्मक असली तरी डॉ.आनंद यादवांच्या प्रमाणे काही ग्रामीण साहित्यिक ग्रामीण कवितेतून आपली अभिव्यक्ती साधत होते. त्या ग्रामीण कविच्या कवितेला लोकमानसाचे खरेखुरे अधिष्ठान प्राप्त झाले ते रानकवी यशवंत तांदळे यांच्या रानकवितेमुळेच.

यशवंत तांदळे यांची काव्यप्रवृत्ती मात्र निसर्गाच्या कुशीत रानामाळात मेंढयाच्या पाठीमागे फिरताना वळणे घेत होती. सरकारी फतवे, योजना, यावर हा शीघ्र कवी रचना करत होता आणि त्याच्यातील उदात्ततेची धोरणे, उद्दिष्टे लोकांसमोर तो मांडीत होता. 20 कलमी योजनेचे फायदे, कुटुंबनियोजनाचे फायदे, मोठया कुटुंबाचे तोटे, लोकांसमोर सादर करुन लोकजागृतीचे काम यशवंत तांदळे यांनी जणू आपल्या खांद्यावर घेतले होते. अशासारख्या रचना ते करीत होते. त्यामुळे त्यांच्या कविता जनमानसाला पटत होत्या. लोकांना आवडत होत्या. त्या ऐकणाऱ्याला आपण या कवितेमध्ये कोठेतरी आहोत असे वाटत होते. कवीच्या भूमिका सोडून जणू काही त्यांनी लोकशिक्षणाचे कार्य हाती घेतले होते. असे म्हणावयास काही हरकत नाही. याबरोबरच रानकवी यशवंत तांदळे यांच्या कालखंडात नवकवीच्या काव्यप्रवृत्तींचा प्रभाव लोकमानसावर होता. विशिष्ट ताल आणि छंद यांच्या साथीत जीवनाचे वेगळे स्वरस सांगणे हे नवकवीचे उद्दिष्ट होते. नवकवितेच्या कवितेतील या प्रवृत्तीचे ग्रामीण जीवनाच्या पार्श्वभूमीवर आढळणारी वेगळी रूपे रानकवीच्या कवितेतही डोकावल्याशिवाय रहात नाहीत. अशारीतीने समकालीन वाड्.मयीन प्रवृत्तीत स्थान लाभल्यामुळे यशवंत तांदळे यांची कविता लोकप्रिय झाली. त्यावेळी काही जीवनात व सामाजिक जीवनातील संकेत निर्माण झालेले आहे.

**समकालीन समाजजीवनातील संकेत**

समाजजीवन कालप्रवाहाबरोबर बदलत असते. व्यक्ती हा समाजाचा केंद्रबिंदू असल्यामुळे त्यांच्या जीवनविषयक धारणा जसजशा बदलत तसतशा त्यांच्या जीवनात नव्यानव्या संकल्पना स्थिरावतात व त्याच त्या

समाजाच्या संकेत बनतात.

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार कै.यशवंतरावजी चव्हाण यांनी आधुनिक महाराष्ट्रातील समाजजीवनात नवा अर्थ प्राप्त करुन दिला. त्यासाठी त्यांनी राजकीय सत्ता हे साधन मानून, अज्ञान, अंधश्रद्धा आणि आर्थिक दुरावस्थतेच्या गर्तेत हजारो वर्षे अडकून पडलेल्या सामान्यमाणसात आत्मभाव निर्माण करणा-या अनेक योजना राबविल्या. सामान्य मराठी माणसात निर्माण झालेली अस्मितेची ही जाण आधुनिक महाराष्ट्राचा एक महत्वाचा संकेत बनला आहे. वाडया, वस्त्यांपर्यंत शिक्षण नेल्यामुळे माणसे शिकून शहाणी झाली. त्यांना आपले हित, अहित कळू लागले. हिताबद्दलची जागरूकता व अहिताबद्दल आवाज उठविण्याचा सूर माणसांना सापडला. त्यामुळे अशा प्रकारच्या सामाजिक प्रवृत्तीबद्दलची जागरूकता हा आजच्या समाजजीवनातील एक संकेत होऊन बसला आहे.

सत्ता हे समाजजीवनाचे साधन हा संकेत रुढ झाल्यामुळे लोकशाही प्रणित समाजवादी रचनेत समाजातील प्रत्येक घटकाला- समुहाला वेगळे महत्व प्राप्त झाले व सामान्य माणूस लोकशाहीच्या मार्गाने सत्तास्थानी येऊ शकतो व समाजाच्या उन्नतीसाठी कार्यरत होऊ शकतो. असे चित्र आज सर्वत्र दिसते. यामुळे दलित, ग्रामीण, भटकेबिमुक्त स्त्री आदिवासी आदि समाजघटकातील व्यक्तींना अभिव्यक्ती साधण्याची संधी प्राप्त झाली आहे. ही आजच्या समाजजीवनातला एक संकेत बनला आहे. व यामुळे समाजातील थरागारांची साहित्य संमेलने वाङ्मयीन चळवळी निर्माण होत आहेत. या सर्व प्रकारच्या नवोदितांना अभिव्यक्तीसाठी प्रेरक म्हणून महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळ यासारख्या शासकीय संस्था उभ्या राहिल्या आहेत. अशारीतीने आधुनिक महाराष्ट्रातील समाजजीवन, सामाजिक समता, राजकीय हक्काची जाणीव, न्याय अन्यायाविरुद्ध आवाज उठविणे, स्वतःच्या जाणीवांना वाङ्मयीन रुप प्राप्त करुन देणे अशा प्रकारचे विविध संकेत आधुनिक महाराष्ट्रात रुढ झाले आहेत.

याच कालावधीत मोठया प्रमाणावर दलित साहित्य लिहिले गेले. तर पुण्यामुंबईतून निर्माण झालेले नवसाहित्य हेही आता साकार होऊ लागले होते. तर दुस-या बाजूला कै. इंदिरा गांधी यांनी घोषित केलेली आणीबाणी त्याचे फायदे तोटे, दुष्परिणाम याचेही चित्रण साहित्यातून होऊ लागले होते. रंगराव बापू

पाटील, महादेव मोरे यासारखे ग्रामीण कथाकार, केशव मेश्राम, फ.म.शिंदे, नामदेव ढसाळ, वामन होवाळ, हिरा बनसोडे इ. सारखे दलित साहित्यिक, लक्ष्मण माने, लक्ष्मण गायकवाड यासारख्या भटक्या विमुक्त जातीचे चित्रण करणारी मंडळी वाङ्‌मयीन क्षेत्रात आपआपला अविष्कार साधत होती तर काहींनी आपले अस्तित्व सिद्‌ध केले होते . "ब्राम्हणाघरी लिवणे, कुणब्याच्या घरी दाणं आणि महाराघरी गाणं" हा परंपरेने चालत आलेला संकेत थोडया स्वरुपात बदललेला असला तरी वस्तुस्थिती मात्र बहुतांशी तशीच होती.

ग्रामीण साहित्यातून समाजजीवनाचे वेगळे असे रूप अजूनही बदललेले नव्हते. रा.रं.बोराडे, शंकर पाटील, उद्‌धव शेळके, दत्ता पवार यांचे साहित्य साकार होऊ लागले होते. म्हणजेच उच्चभू वर्ग हा प्रथमपासूनच वाङ्‌मयनिर्मितीत होता. आणि आता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेतून दलित साहित्याची प्रेरणा घेऊन आत्मचरित्र आणि कथालेखन करुन दलित साहित्यिक हा मराठी साहित्यात स्थिरावला होता. परंतु लोकसाहित्यातून व परंपरेतून अजूनही धनगर याड असेच म्हटले जात होते. धनगर हा साहित्यनिर्मिती करू शकतो. याच्यावर समाजाचा विश्वासच नव्हता. धनगराला प्रतिमा असूच शकत नाही असे लोकांचे मत होते. आणि ते लोकमान्य होते. समाजजीवनातील याच संकेतावर लोकांचा विश्वास होता आणि म्हणूनच खांद्यावर घोंगडे घेऊन यशवंत तांदळे लोकांसमोर आले म्हणजे लोक त्यांना हसत असत. त्यांची चेष्टा करत असत. धनगरांनी केवळ गजेनृत्य करावे, ओव्या गाव्यात, ढोल वाजवावेत. या कलाशिवाय त्यांच्याकडे साहित्य निर्मितीचे गुण असूच शकत नाहीत. हा समाजातील संकेत होता. परंतु यशवंत तांदळे यांनी या लोक विश्वासाला धक्का दिला. आणि अशिक्षित रानावनातून मेंढपाळाचा व्यवसाय करणारा साधा मेंढपाळ ही श्रेष्ठ दर्जाची साहित्यरचना निर्माण करतो. हे त्यांनी लोकांना दाखवून दिले. आणि आपल्या कवितेतून भटक्याच्या दुःखाला त्यांनी वाचा फोडली. दुष्काळाने समाजाचे होणारे हाल, शेतकऱ्याची झालेली दयनीय अवस्था, जनावराचे चाऱ्यापाण्यावाचून उपवाशी मरणे, अशा परिस्थितीत, गावेच्यागावे ओस पडणे, कधी करपा दुष्काळ तर कधी ओला दुष्काळ यामुळे शेतकऱ्याची होणारी उपासमार आणि राजकारणाने ढवळून निघालेले समाजजीवन या साऱ्यांचेच चित्रण या कवीने आपल्या कवितेतून साकार केले आहे. आणि तेही मुक्तछंदात असले तरी ही लयबद्‌ध सुरावटीत गाईले गेल्यामुळेच यशवंत तांदळे जनमानसात लोकप्रिय झाले. त्याचमुळे त्यांच्या कवितेत चित्रित झालेली चित्रणे ही लोकमानसांना

आपली स्वतःची वाटत होती आणि म्हणूनच तळागाळातील लोकांच्यातून त्यांच्या कवितांना चांगल्याप्रकारे प्रतिसाद मिळत होता. परंपरेने चालत आलेल्या समाजजीवनातील संकेतांना तडा जाऊन एक अस्खलीत स्वरुपाची साहित्यनिर्मिती होऊ लागली होती.

**यशवंत तांदळे यांची अभिव्यक्तीची पद्धती**

रानकवी यशवंत तांदळे हे जातीने धनगर होते. त्यांच्यावर झालेले संस्कार हे त्याच समाजातील परंपरेचे होते. त्यांची कविताही उत्स्फुर्त होती शिवाय ते शिकले नसल्यामुळे कोणत्याही इतर प्रवृत्तीच्या कवीचा प्रभाव त्यांच्या अभिव्यक्तीवर पडलेला नाही. अत्यंत सूक्ष्म अवलोकन हे त्यांच्या कवितेमागचे मुख्य सुत्र आहे. त्यांची कविताही रानावनाची कविता आहे.

सुरुवातीला यांच्या कवितेचे तंत्र आणि तिचा अविष्कार हा धनगरी ओवीवर आधारीतच होता. तिची तालबद्धता ही ढोलावरच्या ठोक्यावर होती. पुढे पुढे तिला चिंतनशीलता येत गेली. सखोलतेने पाहिल्यास ही चिंतनशीलता बुद्धिमत्तेच्या उत्स्फुर्तेतून अवतरलेली आहे. या कवितेची अभिव्यक्तिही उत्स्फुर्त असली तरीही ती रचनागेय आहे. आणि गेयतेमुळेच तिला वृतबद्धता लाभली आहे. प्रत्येक ओळीत त्यांनी यमक साधले आहेत. हे यमक साधत असतानाही मात्रागणवृत्ताचे बंधन त्यांनी ठेवलेले नाही. तर लयबद्धतेसाठी बऱ्याच ठिकाणी त्यांची ओढाताण झालेली आहे म्हणूनच तिला काही वेळेला मुक्तछंदाचे स्वरुप प्राप्त झाले आहे.

तसेच काही कविताच्या बाबतीत ही रचना म्हणजे जणू पोवाडाच आहे. आणि या पोवाडयातून बऱ्याच ठिकाणी निवेदन केले गेले आहे. तेथे त्यांनी वीररसाचा वापर केला गेला आहे. असे मात्र वाटत नाही तर अभिव्यक्तीसाठीच हा छंद त्यांनी वापरला आहे. त्यांच्या अभिव्यक्तीत त्या त्या परिस्थितीचे अत्यंत काटेकोर शब्दात त्यांनी चित्र रेखाटले आहे. व ते अत्यंत रेखीव व बोलके आहे. आपल्या कवितेतून बऱ्याच ठिकाणी शब्दचमत्कृतीचा वापर केला आहे. त्यामुळे विनोद निर्मितीही साधली आहे. 'फॅशनवाला'[7] या कवितेत त्याचा आपणाला प्रत्यय येतो. तर काही काही कवितामधून करुणरसाचा वापर त्यांनी केलेला आहे. त्यांना गेयतेचा एक सूर असल्यामुळे जरी शब्दातून ते सामर्थ्य अवतरले नसले तरीही त्यांच्या म्हणण्यात मात्र कातरता होती आणि त्यामुळे श्रोत्यांचे अंतरंग हेलावून टाकण्याचे सामर्थ्य त्यांच्या अभिव्यक्तीत होते. दुष्काळाचे शब्दचित्र रंगवत

असताना त्या कारुण्याचा प्रत्यय आपणाला येत रहातो.

यशवंत तांदळे ज्या ज्या ठिकाणी जावे त्या त्या परिसराचे वर्णनही ते आपल्या कवितेतून करत असत. धनगरी ओव्यातून मोड घेण्याची जी पद्धती आहे. तिचा अत्यंत चपखल वापर त्यांनी आपल्या अभिव्यक्तीत साधला आहे. त्याचबरोबर तत्कालीन स्थितीत जी गाणी लोकप्रिय झाली होती त्या चालीचा वापरही त्यांनी आपल्या कवितेच्या अभिव्यक्तिसाठी केलेला आहे. तर बऱ्याच कवितेच्या चाली या पारंपारिक आहेत. 'पाळणा' सादर करताना पारंपारिक जी स्त्रियांची 'हेल' काढण्याची पद्धती आहे तिचाही वापर त्यांच्या अभिव्यक्तित आहे.

कवी यशवंत तांदळे यांच्या मनावर रानातील वहाता वारा, वहाते पाणी, आणि वाहती लोकवाणी यांचा संस्कार झाला होता. त्यामुळे लोकजीवनातील लोकसंगीताच्या अनेक लकबा आणि धुनी त्यांनी आत्मसात केल्या होत्या. त्यामुळे त्यांच्या कवितेला लोकसंगीताचे अभिनव लेणे लाभले होते. मराठी लोकगीत म्हणून ज्या धनगरी ओव्या आणि मराठी शाहिरी सामान्य माणसाच्या मनात घर करुन बसली होती. त्याचाच परिणाम आहे. त्यामुळे कवी यशवंत तांदळे अभिव्यक्तीला लोकगीत म्हणजेच अधिक उचित ठरावे. इतकी समर्थ अशी ही लोकमानसाच्या अभिव्यक्तिची पद्धती होय. अशी कवीत क्वचितच पहावयास मिळते. अशी होती रानकवी यशवंत तांदळे यांची अभिव्यक्तीची पद्धती.

**कवी यशवंत तांदळे यांची अखेर**

अशारीतीने आपल्या स्वतंत्र व्यक्तिमत्वाच्या स्वतंत्र अभिव्यक्तिने मराठी लोकमानसाच्या हृदय सिंहासनावर अढळ स्थान प्राप्त करुन घेतलेल्या रानकवी यशवंत तांदळे यांच्या मृत्युविषयी मतभेद आढळतात. काही लोकांच्या मते त्यांचा मृत्यु हा क्षयरोगाच्या आजाराने झाला. तर काही लोकांच्या मते त्यांना विषबाधा झाली असे ऐकावयास मिळते.

रानकवी यशवंत तांदळे यांची प्रसिद्धी वाढत होती. त्यांचे पर्यावसन म्हणजे त्यांचे घरावरुन लक्ष उडले होते. कारण रोजच त्यांना बाहेरगावी कार्यक्रमाच्या निमित्ताने जावे लागे. त्यांच्या काव्यवाचनाचा कार्यक्रम बेळगावला झाला . या कार्यक्रमाच्यावेळी त्यांनी आपल्या कविता सादर केल्याने त्यांना मोठया प्रमाणावर

प्रसिद्धी मिळवून दिली. रोजचा प्रवास त्यांच्या प्रकृतीला पेलवेनासा झाला. व त्यांचा हा प्रवास खुप मनःस्ताप देऊन गेला. त्यामुळे त्यांना स्वतःलाच पश्चाताप झाला. बेळगावहुन परत आल्यावर त्यांना कार्यक्रमासाठी म्हणून सोलापूरला जावे लागणार होते. परंतु ऐनवेळीच ते निमंत्रण रद्द करण्यात आले. त्याच्या त्या भाबडया मनाच्या कवीला खुप मोठा धक्का बसला. त्यातच त्यांचे डोके मोठयाप्रमाणावर दुखू लागले. प्रकृती दिवसेंदिवस खालवत चालली. शरीराचा ताप दिवसेंदिवस वाढत चालला. वजन घटू लागले. म्हणून औषधोपचारासाठी त्यांना कराड येथे दवाखान्यात नेण्यात आले. परंतु आर्थिक पुरवठा कमी होता. म्हणून एका साध्याच दवाखान्यात त्यांच्यावर औषधोपचार चालू करण्यात आले. डॉक्टरांना त्यांच्या आजाराचे निदानच लवकर झाले नाही.

1982 ला मुख्यमंत्री वसंतराव दादा पाटील यांच्या दौऱ्याचा कार्यक्रम कराडला होता. त्यावेळी त्यांची व दादांची भेट झाली. त्यांच्या परिस्थितीची विचारपूस झाल्यानंतर दादांनी औषधोपचारासाठी म्हणून रुपये पाच हजारांचा चेक तांदळे यांच्या स्वाधीन केला. या कराडच्या डॉक्टरांच्या औषधाने त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होईनासे झाल्यानंतर औषधोपचारासाठी म्हणून ते मिरज येथील मिशन हॉस्पिटलमध्ये दाखल झाले. तेथील डॉक्टरांच्या निदानावरुन त्यांना विषबाधा झाल्याचे सांगण्यात आले व औषधोपचार चालू केले. परंतु खुपच वेळ झाला होता. अखेरच्यावेळी काही तास ते बेशुद्ध अवस्थेतच होते. परंतु अशावेळीही त्यांच्या ओठात होती ती कविताच. डॉक्टरांचे उपाय खुंटले अन् अखेर ता. 08.09.1986 रोजी त्यांचे देहावसान झाले.

**निष्कर्ष :-** अशारीतीने सामान्य धनगर कुटुंबात जन्माला येऊनही परिस्थिती आणि सभोवतालचे विश्व यांच्यातील ताणतणावांनी गलितमात्र न होता यशवंत तांदळे यांचे काव्यात्मक मनोवृत्तीचे व्यक्तिमत्व विकसित झाले. रान आणि जनावरे यांच्याशी एकरुप झालेले हे कवीमन हळूहळु पारंपारिक पद्धतीने अभिव्यक्तिक्षम बनले. धनगरी ओव्या या लोकगीताच्या संस्कारातून लोकजीवनातल्या ताणतणावांनी निसर्गातील सुंदर दृश्यांनी हे कविमप सुखद झाले. या कविमनाला लाभलेली लोकसंगीताची बैठक त्यांच्या रांगडया शब्दात आणि रानवटी सुरात व्यक्त करणारा हा कवी प्रतिथ यश कवीकडून 'रानकवी' या उपाधीला प्राप्त ठरला. त्याच्या गायकीच्या ढंगामुळे आणि सुरावटीच्या नवतेमुळे त्याला अमाप लोकप्रियता लाभली. या लोकप्रियतेचा परिणाम प्रतिथ यशाकडून मत्सरात झाला. तरी या नवकवीचे रानातले बोल आजही अनेकांच्या जिभेवर तरळताना दिसतात. स्वतःला लिहिता वाचता

येत नसले तरी त्यांची ही लोकमुखी झालेली कविता हेच त्याच्या यशाचे गमक असून त्यामुळे त्यांना लाभलेली लोकप्रियता त्याच्या मृत्युला कारणीभूत व्हावी हे मराठी संस्कृतीच्या दृष्टीने कधीही न भरुन येणारे नुकसान आहे. असाच निष्कर्ष शेवटी काढावा लागतो.

* * *

## ** संदर्भ टिपा **

## ** प्रकरण तिसरे **

1. श्री. सदाशिव कल्लाप्पा हेळवी, मु. पो. भिर्डी , ता. रायबाग जि. बेळगांव यांनी लिहून पाठविलेल्या वंशावळीवरून परिशिष्ट क्रमांक 2 मध्ये तपशील दिला आहे.
2. विटयातील त्यांच्या मामांच्या घरी मिळालेल्या माहितीवरून
3. प्रबंधिका परिशिष्ट क्रमांक 1 , कविता क्र. 2 पृष्ठ क्र. 146
3. उनि कविता क्रमांक 2 पृष्ठ क्र. 146
5. उनि कविता क्रमांक २ पृष्ठ क्र. 146
6. उनि कविता क्रमांक 23 पृष्ठ क्र. 184
7. उनि कविता क्रमांक 3 पृष्ठ क्र. 148

* * *